नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 21/07/2021 (बुधवार)
(दुपार)

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 02 कि. मी. अंतरावर पो.स्टे. काटोल समोर येथे दिनांक 20/07/2021 चे 16.10 वा. ते 17.05 वा. दरम्यान काटोल पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन काटोल पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एम. एच.– 30/ बीडी – 5679 क्रमांकाच्या आयसर गाडीला थांबवुन पाहणी केली असता गाडी मध्ये एकुण 13 म्हशी कि. 2,60,000/–रू. ही जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. आरोपी नामे– 1) पुरूषोत्तम शिवलाल भोगे, वय 41 वर्ष, रा. वणीरंभापुर, ता.जि. अकोला, 2) पंजाब सूखदेवराव अवगत, वय 53 वर्ष, रा. पिंपरी ता मंगळूपीर, जि. वाशीम व 3) प्रविण जनार्धन चव्हाण, वय 36 वर्ष, रा. सेलू बाजार, ता. मंगळूपीर जि. वाशीम यांच्या ताब्यातुन वाहनासह एकुण किंमती 9,60,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस शिपाई चेतन ठाकरे, पो.स्टे. काटोल यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे वरील आरोपीतांविरुध्द कलम 11 (1)(जी)11(1)(डी) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 5(ए) 9 महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, तसेच कलम 34 भादवी काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीतांना सुचनापत्रावर रिहा करण्यात आले. गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलीस नाईक सुचिता भुक्ते 8793782618 या करीत आहे.

सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. राकेश ओला, अपर पोलिस अधीक्षक श्री राहुल माकणीकर, उपविभागिय पोलिस अधिकारी काटोल विभाग श्री. नागेश जाधव यांचे मार्गदर्शनात ठाणेदार पोनि श्री महादेव आचरेकर, मनापोशी सुचिता भुक्ते, पोलीस शिपाई चेतन ठाकरे व गुलाब भालसागर यांनी केलेली आहे.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर